॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

9420802145 www.veerbhuminews.com

अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३३६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### विधानपरिषद

परिषदेचे निदान पाहून
पक्षशिस्तीत वागू लागले
आतमध्ये जाण्यासाठी
बाहेर भीक मागू लागले

पक्ष दुभत्या गायीसारखा
लाथाही लागतात गोड
आमदारकीच्या महत्वाकांक्षेने
सतरंज्यांना फुटलेत मोड

वीरभूमी

## SPOT NEWS

### एल निनोच्या आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी सज्ज रहा

● **मुंबई** – संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी, प्रभावी अंमलबजावणी आणि समन्वयाच्या माध्यमातून या आपत्तीचे सौम्यीकरण करण्यात यावे. यासाठी सर्व विभागांनी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती तसेच पुनरुज्जीवन यावर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे दिले. भारतीय हवामानशास्त्र विभागाने यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज उच्चस्तरीय बैठक पार पडली. यंदा पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहील. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी राहील मात्र उष्णतेच्या लाटा अधिक प्रमाणात येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### स्व. आ. शिवाजीराव कर्डिले यांचे

# ‘विकासस्वप्न’ पूर्ण करण्याची जबाबदारी माझी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । एमआयडीसी, उड्डाणपूल, वीज, कर्जमाफीसह विकासाचा मोठा आराखडा



● **राहुरी । वीरभूमी –** राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या भव्य जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अपूर्ण राहिलेल्या विकासस्वप्नांची पूर्तता करण्याची जबाबदारी स्वतः घेत असल्याची ठाम ग्वाही दिली. ही निवडणूक केवळ राजकीय नसून भावनिक आहे. अक्षय कर्डिले यांचा विजय म्हणजे स्व. कर्डिले साहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, राहुरीतील उड्डाणपूल, एसटी डेपो यांसारख्या प्रलंबित प्रश्नांसाठी राज्याच्या तिजोरीचा ‘बिअरर चेक’ मी अक्षय कर्डिले यांना देत आहे. त्यांनी मांडलेल्या सर्व मागण्या पूर्ण केल्या जातील. तसेच कृषी विद्यापीठाच्या अतिरिक्त १००० एकर जागेवर एमआयडीसी उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग आणण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला गती देत बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना, दिवसा मोफत वीज पुरवठा, तसेच ‘लाडकी बहीण’ योजनेचा सातत्याने लाभ देण्याबाबत सरकार कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. महिला आरक्षणाबाबत बोलताना त्यांनी विरोधकांवर टीका करत महिलांनी मोठ्या संख्येने मतदान करून योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन केले.

स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांचा उल्लेख करताना मुख्यमंत्री भावूक झाले. ते दिलखुलास, संघर्षशील आणि जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे नेते होते. दररोज ६० ते १०० किलोमीटर फिरून त्यांनी जनतेशी नाळ जपली. विपरीत परिस्थितीतही ते कधी झुकले नाहीत. त्यांच्या प्रत्येक गावापर्यंत समृद्धी पोहोचवण्याचे स्वप्न आम्ही पूर्ण करू, असे ते म्हणाले. मुळा धरणातील गाळ काढून तीन टीएमसी पाणीसाठा वाढवण्याचे कामही हाती घेतले जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

उमेदवार अक्षय कर्डिले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, स्व. वडिलांचे अपूर्ण राहिलेले विकासस्वप्न पूर्ण करण्यासाठी मला संधी द्या. शेवटच्या श्वासापर्यंत जनतेची सेवा करत त्यांच्या वारशाला न्याय देईन.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, आपण दुःखद परिस्थितीत निवडणूक लढवत आहोत. अक्षय कर्डिले यांना ऐतिहासिक विजय मिळवून देणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल. समाजातील सर्व घटकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत असून विकासासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. त्यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेल्या सहकार्याच्या भूमिकेबद्दल आभारही व्यक्त केले.

विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनीही विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अक्षय कर्डिले यांना पूर्ण ताकद द्या, असे आवाहन केले.

यावेळी आ. संग्राम जगताप, माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार मोनिका राजळे, आ. विठ्ठलराव लंघे, आ. प्रसाद लाड, आ. अमोल खताळ, आ. काशिनाथ दाते, माजी आ. स्नेहलता कोल्हे, महापौर ज्योतीताई गाडे, तसेच दिलीप भालसिंग, सत्यजित कदम पाटील, अलका कर्डिले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या सभेला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एकूणच, या जाहीर सभेतून भाजप महायुतीच्या प्रचाराला मोठी चालना मिळाली असून अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी जनतेचा वाढता पाठिंबा स्पष्टपणे दिसून आला.

## पाथर्डीत उष्माघाताने तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

● **पाथर्डी । वीरभूमी–** तालुक्यातील वाढत्या उन्हाचा कडाका जीवघेणा ठरत असून, तालुक्यातील निवडुंगे येथे उष्माघाताने एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. राधाकृष्ण रामचंद्र मरकड (वय ३३) असे मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मरकड कुटुंबाचा शेती व्यवसाय असून शेतीची कामे करत असताना तापमान ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान गेले होते. कडक उन्हात काम करत असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर चक्कर येऊन ते शेतातच कोसळले. ही बाब लक्षात येताच इतरांनी तत्काळ धाव घेतली. त्यांच्या मदतीने त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले.

प्राथमिक उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक अंदाजानुसार उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचे सांगितले, अशी माहिती उपस्थितांकडून मिळाली.

यानंतर पाथर्डी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, पाथर्डी तालुक्यासह जिल्ह्यात उष्णतेची तीव्रता वाढली असून उष्माघात, निर्जलीकरण व थकव्याच्या तक्रारी वाढत आहेत. ग्रामीण भागातील शेतमजूर व नागरिकांना दुपारच्या वेळेत काम करावे लागत असल्याने धोका अधिक वाढला आहे.

## लाच घेतांना ग्रामसेविका व कंत्राटी अधिकारी चर्तुभूज

● **अहिल्यानगर । वीरभूमी–** नगर तालुक्यातील खारे करर्जुने येथील ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेविका पुष्पावती सिताराम डेरे व कंत्राटी अधिकारी गौतम सूर्यवंशी यांना सोमवारी दुपारी ग्रामपंचायत कार्यालयातच १० हजार रुपयांची लाच घेताना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच मागून ती पंचासमक्ष स्वीकारताना त्यांना अटक करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेमुळे पंचायत समिती परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

पुष्पा डेरे (ग्रामसेविका, ग्रामपंचायत खारे करर्जुने, ता. नगर – वर्ग ३ व गौतम सूर्यवंशी (ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती अहिल्यानगर – कंत्राटी) यांना प्रत्येकी ५,००० रुपये प्रमाणे एकूण १०,००० रुपयांची लाच स्वीकारण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणातील माहिती अशी की, तक्रारदार यांच्या वडिलांनी सन २०२३ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलासाठी ग्रामपंचायत खारे करजूने येथे अर्ज केला होता. सन २०२४ मध्ये ऑनलाइन यादीत नाव आल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यात १५,००० रुपयांचे अनुदान जमा झाले. त्यानंतर प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ मंजुरीसाठी ग्रामसेविका पुष्पा डेरे यांनी १०,००० रुपयांची लाच मागितली. तसेच, घरकुलाच्या तपासणीसाठी आलेल्या गौतम सूर्यवंशी यांनीही निधी मिळवून देण्यासाठी १०,००० रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार पडताळणी कारवाईदरम्यान ग्रामपंचायत कार्यालय, खारे करर्जूने येथे आरोपींनी प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-२ मंजुरीसाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.



# SPOT NEWS

## राहुरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चार दिवस कोरडा दिवस जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

राहुरी विधानसभा पोटनिवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी २१ ते २३ एप्रिल या कालावधीत तसेच मतमोजणीच्या ४ मे रोजी संपूर्ण दिवस कोरडा दिवस लागू करण्यात आला असून संबंधित क्षेत्रात मद्यविक्रीस बंदी घालण्यात आली आहे, असा आदेश जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जारी केला आहे. मतदान संपण्याच्या ४८ तास आधीपासून म्हणजे २१ एप्रिलपासून २३ एप्रिलपर्यंत व मतमोजणीच्या दिवशी ४ मे रोजी राहुरी विधानसभा मतदारसंघ व मतमोजणी केंद्र परिसरात कोरडा दिवस काटेकोरपणे अंमलात आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कालावधीत सर्व अनुज्ञप्तीधारकांनी देशी व विदेशी मद्यविक्री पूर्णपणे बंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ (सी) तसेच मुंबई दारूबंदी कायदा १९४९ च्या कलम १४२ व संबंधित नियमांच्या आधारे हा आदेश लागू करण्यात आला आहे. संबंधित सर्व परवानाधारकांनी या कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे. नमूना आय, सीएल-१, पीएलएल, बीआरएल या घटकांना उत्पादनास परवानगी असली तरी कोरडा दिवस कालावधीत कोणत्याही प्रकारची मद्यविक्री करता येणार नाही. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांवर कडक कारवाई करून त्यांची अनुज्ञप्ती कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## अहिल्यानगरात २५ एप्रिलला ‘राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६’चे भव्य आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील नामांकित राजस्व स्पोर्ट्स क्लबतर्फे विविध क्रीडा उपक्रम सातत्याने राबविले जात असून, यंदा शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी ‘राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६’चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अहिल्यानगरमधील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तसेच जिल्ह्यातील सर्वात मोठ्या सिंथेटिक स्केटिंग रिंगवर पार पडणार आहे. स्पर्धा ४, ६, ८, १०, १२ वर्षे वयोगटांसह खुल्या गटात आयोजित करण्यात येणार असून, टेनासिटी, क्वाड, रिक्रिएशन इनलाईन व प्रोफेशनल इनलाईन अशा विविध प्रकारांमध्ये मुले व मुलींसाठी सामने होणार आहेत. या स्पर्धेचा उद्देश स्केटिंग खेळाडूंचा वेग, कौशल्य आणि सर्वांगीण विकास साधणे तसेच जिल्ह्यातील स्केटिंग खेळाचा दर्जा उंचावणे हा आहे, अशी माहिती क्लबचे संस्थापक संचालक चेतन सहाणे यांनी दिली. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात येणार असून, सर्व सहभागी खेळाडूंना प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे. स्पर्धेचे ठिकाण प्रेमदान चौक, धर्माधिकारी मळा, लिटिल फ्लॉवर स्कूलजवळील राजस्व स्पोर्ट्स क्लब येथे असून, स्पर्धेला दुपारी ३ वाजता प्रारंभ होणार आहे. नोंदणीची अंतिम मुदत शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध शाळा व स्केटिंग अकॅडमीतील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रशांत पाटोळे यांनी केले आहे.

## जात-अंधश्रद्धा निर्मूलनासाठी रविवारी ‘जनलोक एनजीआय क्रांती सत्याग्रह’

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जात, अंधश्रद्धा आणि मतदास्य निर्मूलनासाठी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने २६ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथे ‘जनलोक एनजीआय क्रांती सत्याग्रह’ आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून राष्ट्रव्यापी वैचारिक जागृती घडविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या उपक्रमामागे सामाजिक विचारांना विज्ञानाची जोड असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या विचारांना आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून पुढे नेण्याचा प्रयत्न या सत्याग्रहातून होणार असल्याचे सांगण्यात आले. पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, जात ही जैविक नसून मानसिक संकल्पना आहे. ‘नॉन-जेनेटिक इन्फॉर्मेशन’ (छत्रख) या स्वरूपात ती मेंदूत साठवली जाते. पालकांकडून मुलांकडे जात रक्ताने नव्हे, तर संस्कार आणि सामाजिक प्रभावातून जाते. न्यूरोप्लास्टिसिटी या वैज्ञानिक संकल्पनेनुसार, नवीन विचार स्वीकारल्यास मेंदूची रचना बदलू शकते. त्यामुळे जातभावना मनातून दूर केल्यास समाजात बदल घडू शकतो, असा दावा त्यांनी केला. हा सत्याग्रह मतदास्यापासून मुक्त, जागृत नागरिक घडविण्यावर लक्ष केंद्रित करणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जातीनुसार मतदान करणारी प्रवृत्ती बदलण्यासाठीही या उपक्रमातून प्रयत्न होणार असून, विज्ञानाधारित विचारांमुळे समाज अधिक एकसंध होईल आणि विकासाला गती मिळेल, असे मत व्यक्त करण्यात आले. या आंदोलनाचा पुढील टप्पा म्हणून ‘जनलोक संडे स्कूल’ सुरू करण्यात येणार असून, दर रविवारी नागरिकांना वैज्ञानिक व जातिमुक्त विचारांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी अशोक सब्बन, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीर बहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी प्रयत्नशील आहेत.

# राष्ट्रीय पोषण पंधरवड्यात अहिल्यानगर जिल्हा देशात प्रथम

### जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय कदम यांची माहिती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या आठव्या राष्ट्रीय पोषण पंधरवड्यातील जनजागृती उपक्रमांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार ९ एप्रिल ते २३ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये हे उपक्रम राबविले जात आहेत. अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय कदम यांनी दिली.

या पंधरवड्यात आतापर्यंत तीन लाख चोवीस हजार पंचाहत्तर उपक्रम नोंदवून अहिल्यानगर जिल्ह्याने देशात आघाडी घेतली आहे, तर पुणे जिल्हा दुसऱ्या व बिहारमधील मुझफ्फरपूर जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. या पंधरवड्याचे राष्ट्रीय स्तरावरील उद्घाटन केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री यांच्या हस्ते वेबकास्टद्वारे झाले.

जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते या उपक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.



बालकाच्या आयुष्यातील पहिली सहा वर्षे पोषण व शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची असतात. याच अनुषंगाने बालकांच्या जीवनातील पहिल्या सहा वर्षांतील मेंदूचा विकास या मुख्य संकल्पनेवर यंदाचा पंधरवडा केंद्रित आहे. यामध्ये माता व बालकांचे पोषण, शून्य ते तीन वर्षे वयोगटातील बालकांच्या मेंदूच्या विकासाकरिता पूर्व उद्दीपन, तीन ते सहा वर्षे वयोगटातील मुलांसाठी खेळ आधारित पूर्व शालेय शिक्षण, बालकांचा स्क्रीन वेळ कमी करण्यासाठी पालकांची भूमिका व अंगणवाडी केंद्र सक्षम करण्यासाठी समुदायाचा सहभाग वाढविणे या प्रमुख विषयांवर विशेष भर दिला जात आहे.

गाव पातळीवर आरोग्य, शालेय शिक्षण, ग्रामविकास व इतर संबंधित विभागांच्या समन्वयाने हे अभियान राबविले जात आहे. ग्रामपंचायत व अंगणवाडी स्तरावर मशाल फेरी, पाककृती स्पर्धा, पोषण रॅली, माता-बालक आरोग्य मार्गदर्शन शिबिरे, आहार प्रात्यक्षिके, गृहभेटी तसेच पालक बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे.

यामध्ये महिला, पालक व स्थानिक नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांनी या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

## आर. जे. एस. फार्मसी कॉलेजमध्ये शनिवारी राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन

### From Molecule to Medicine विषयावर २५ एप्रिलला तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**● कोपरगाव । वीरभूमी –**

राष्ट्रसंत जनार्दन स्वामी फाउंडेशनच्या आर. जे. एस. फार्मसी कॉलेजमध्ये From Molecule to Medicine: Drug Discovery, Design Formulation या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे चर्चासत्र दि. २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या प्रेक्षागृहात होणार आहे.

या चर्चासत्राचा मुख्य उद्देश औषध निर्मिती क्षेत्रातील नव्या संशोधन प्रवाहांची माहिती देणे, तसेच विद्यार्थ्यांना, संशोधकांना व प्राध्यापकांना आधुनिक तंत्रज्ञानाशी परिचित करणे हा आहे. विशेषतः Computer--ided Drug Design (C-DD), drug formulation, bioavailability enhancement, QS-R studies, molecular docking यांसारख्या अत्याधुनिक विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संतोष एस. छाजेड (MET's Institute of Pharmacy, नाशिक) व डॉ. सचिन एस. गायकवाड (MET's Institute of Pharmacy, नाशिक) उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. ते अनुक्रमे Computer--ided Drug Design (C-DD): Tools and Applications in Drug Discovery Am{U Drug Formulation Strategies: From Active Molecule to Effective Dosage Form या विषयांवर सविस्तर व्याख्याने देणार आहेत.

सेमिनारमध्ये नोंदणी, उद्घाटन, तज्ज्ञ व्याख्याने, प्रश्नोत्तर सत्र, तसेच प्रमाणपत्र वितरण अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. या कार्यक्रमात प्राध्यापक, संशोधक (PG/PhD) तसेच B.Pharm आणि M.Pharm विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

नोंदणी शुल्क फक्त २००/- ठेवण्यात आले असून इच्छुकांनी २२ एप्रिल २०२६ पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी क्यू आर कोडद्वारे किंवा ऑनलाइन लिंकद्वारे अर्ज करता येणार आहे. अधिक माहितीसाठी ९६०४६७९००० ह्या दूरध्वनी क्रमांकाशी संपर्क साधावा.

महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष चांगदेव कातकडे, सचिव प्रसाद कातकडे, सल्लागार दीपक कोटमे व विजय कडू, संचालक प्रणित कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. नितीन पी. जैन (प्राचार्य) असून सहसंयोजक डॉ. उषा जैन आणि समन्वयक कवडे डी. एम. हे आहेत. औषधनिर्मिती क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान मिळविण्याची ही उत्तम संधी असून, इच्छुकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## अक्षय्य तृतीया निमित्त हापूस आंब्यांनी नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात आकर्षक सजावट

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अक्षय्य तृतीया या पवित्र आणि मंगलमय सणानिमित्त नवी पेठ येथील श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने श्रीराम मंदिरात हजारो हापूस आंब्यांची भव्य व आकर्षक सजावट करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर परिसर सुगंधी आणि रंगीबेरंगी आंब्यांच्या सजावटीने नटला असून, या अनोख्या उपक्रमामुळे भाविकांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले.



सकाळपासूनच मंदिरात भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. हापूस आंब्यांच्या सुवासाने संपूर्ण परिसर दरवळून गेला होता, तर मंदिरातील देखणे व नयनरम्य सजावट पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थिती लावली. सजावटीमुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते आणि प्रत्येक भाविक या दैवी वातावरणात हरखून जात होता.

या प्रसंगी श्रीरामाची महाआरती मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली. आरतीदरम्यान जय श्रीराम आणि जय हनुमान जयजयकारच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेत प्रार्थना केल्या आणि अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पुण्यसंचय केला.

ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखील शेटिया सांगितले की, मंडळाच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक उत्सव व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. श्रीराम जन्मोत्सव, हनुमान जन्मोत्सव, गोकुळ अष्टमी, अन्नकूट महोत्सव, देवदिवाळी ,प्रतिष्ठा द्वादशी यांसारखे उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. तसेच दर शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेत संगीतमय श्री हनुमान चालीसा पाठ, भजन संध्या कार्यक्रमास तरुणांचा वाढता प्रतिसाद पाहून ट्रस्ट वतीने येत्या शनिवार पासून बैठक व्यवस्था वाढविण्यात येणार आहे .

अक्षय्य तृतीया निमित्त करण्यात आलेली ही आंब्यांची सजावट केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून, सामाजिक एकोप्याचेही दर्शन घडवणारी ठरली. मंदिर परिसरात स्वच्छता, सुंदर रोषणाई आणि शिस्तबद्ध व्यवस्था यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी ठरला. ट्रस्टचे सेवेकरी यांनी भाविकांना योग्य मार्गदर्शन करत सुरळीत दर्शन व्यवस्था ठेवली.

## शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देण्याचे काम मुलिका देवी विद्यालयातील शिक्षकांनी केले

### दत्तात्रय झेंडे महाराज । मुलिका देवी विद्यालयातील शिक्षकांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

**● निघोज । वीरभूमी–**

मुलिका देवी विद्यालयाचा लौकिक जिल्ह्यात असून येथील शिक्षकांनी प्राचार्य अंकुश अवघडे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली काम करताना शैक्षणिक संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन दत्तात्रय झेंडे महाराज यांनी केले आहे. प्राचार्य अंकुश अवघडे, ज्येष्ठ शिक्षक शिवाजी गुंजाळ, ज्येष्ठ शिक्षीका तुळसाबाई तांबे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ दत्तात्रय महाराज झेंडे यांच्या शुभहस्ते व सामाजिक कार्यकर्ते डॉ रफिक सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला यावेळी ते बोलत होते.

डॉ. सय्यद यांनी यावेळी धर्म, समाज आणि एकात्मता यावर विवेचन करीत समाजात सर्वधर्मसमभाव व एकता नांदावी यासाठी युवा पिढीने प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यावेळी म्हणाले, प्राचार्य अंकुश अवघडे यांना प्राचार्य पदाचा कार्यकाळ निघोज येथे फक्त एक वर्षाचा मिळाला मात्र या वर्षभरात विद्यार्थी, पालक, शिक्षक यांचा समन्वय, विद्यालयातील शिस्त आणि झालेल्या प्रत्येक परीक्षा असो किंवा स्पर्धा असो, यामध्ये मुलिका देवी विद्यालयाचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्राचार्य अवघडे यांचे कार्य अद्वितीय होते.

अशा कार्यक्षम प्राचार्यांना मुदतवाढ देऊन संस्थेने त्यांचा गौरव करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन व्यक्त करताना सचिन पाटील वराळ यांनी गुंजाळ सर व तांबे मॅडम यांनीही या विद्यालयासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले असून विद्यालयाचा नावलौकिक वाढविण्यासाठी इतर शिक्षकांची पराकाष्ठा मोठी असल्याचे सांगितले. तसेच निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य अंकुश अवघडे यांनी सांगितले की वर्षभराचा कार्यकाळ मिळाला असला तरी निघोज गावकऱ्यांकडून शिकण्यासाठी भरपूर मिळाले आहे. निघोज गाव हे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात अग्रगण्य असून सामाजिक काम करताना संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, सरपंच चित्राताई वराळ पाटील, स्कूल कमिटीचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, माजी अध्यक्ष विलासराव हारदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने विद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांना सहकार्य केले.

प्राचार्य म्हणून निवृत्त झालो असलो तरी यापुढे शैक्षणिक कार्यात सहभागी होऊन विद्यार्थी



सेवा करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. ज्येष्ठ शिक्षक गुंजाळ सर व ज्येष्ठ शिक्षीका तांबे मॅडम यांनी शैक्षणिक सेवा हीच विद्यार्थी सेवा असून तीच खरी ईश्वर सेवा असल्याचे सांगत विद्यालयाशी आपले भावनिक नाते व्यक्त केले.

यावेळी विविध सामाजिक संस्था, पत्रकार संघ, अहिल्यानगर जिल्ह्यातून आलेले प्राचार्य, माजी प्राचार्य, ज्येष्ठ शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक तसेच नातेवाईक, आप्तेष्ट व मित्रपरिवार यांच्या उपस्थितीत सेवानिवृत्त प्राचार्य व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ शिक्षक धनंजय खोसे यांनी विद्यालयाची माहिती देत शब्दरूपी गौरव केला.

उपप्राचार्य के. एस. मोकळे, पर्यवेक्षक एल. ए. झंजाड, समन्वयक प्रा. के. एस. पाडळकर, ज्येष्ठ शिक्षक मेहबूब इनामदार तसेच सर्व शिक्षक व शिक्षीका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिक्षक सबाजी बेलोटे सर यांनी केले तर आभार प्राध्यापक दारकू खोडदे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप गोड अशा सुरुची भोजनाने करण्यात आला.

# अनावश्यक खर्चाला फाटा देत तथागत प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

तथागत प्रतिष्ठानच्या वतीने रामवाडी, कोठला परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डिजेच्या अनावश्यक खर्चाला फाटा देत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना वह्या व स्कूल बॅगचे वितरण करण्यात आले. जीएसटी कमिशनर विवेक घोडके, मतीन शेख, नवनाथ गवळी, आदित्य येलमाने, स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीचे नेते प्रतीक बारसे, सुजय म्हस्के, संजय कांबळे, सुजित घंगाळे, सागर चाबुकस्वार, अविनाश कांबळे, नादीर शेख, प्रवीण ओरे, सुरेश पानपाटील, विजय शिरसाठ, स्वप्नील साठे, जमीर सय्यद, योहान चाबुकस्वार, जावेद सय्यद, नईम शेख, आरपीआय महिला घाडीच्या ज्योती पवार, सविता भालेराव, सारिका साळवे, शीतल नाटिकर, अर्चना गायकवाड, विश्रांती पठारे, तथागत प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत म्हस्के, तुषार गायकवाड, संपदा म्हस्के, सुयश काळे, उमेश गायकवाड, सुशीला म्हस्के, मनीषा गायकवाड , संजना गायकवाड, माधवी म्हस्के, हर्षल म्हस्के, ड. कार्तिक म्हस्के, साकेत गायकवाड, हर्षल पेंढारकर, आकाश काळे, शहेबाज शेख, सचिन बाबणी, सुनिल भोसले, विशाल व्यवहारे, विकी प्रभळकर, संजय साळी आदी कार्यकर्ते व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जीएसटी कमिशनर विवेक घोडके म्हणाले की, तथागत प्रतिष्ठानच्या माध्यमातून कार्यकर्ते आंबेडकरी विचाराने प्रेरित होऊन कार्य करत आहेत. समाजात आंबेडकरी चळवळ सक्रियपणे राबवली जात असून, युवक मोठ्या प्रमाणात समाजकार्यात सहभागी होत आहेत. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा बाबासाहेबांचा विचार समाजात रुजविण्याचे कार्य अशा उपक्रमांमधून घडत आहे. शिक्षणातूनच खऱ्या अर्थाने परिवर्तन शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

सुशांत म्हस्के म्हणाले की, तथागत प्रतिष्ठान दरवर्षी वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देत आहे. आगामी काळात स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात टॅलेंट असूनही योग्य दिशा नसल्यामुळे ते मागे पडतात. त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



प्रतिक बारसे म्हणाले की, वंचित आणि शोषित घटकातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःमध्ये बदल घडवून आणला पाहिजे. शिक्षण हेच यशाचे खरे साधन असल्याचे स्पष्ट केले. सुजय म्हस्के यांनीही आपल्या मनोगतात सांगितले की, सर्वसामान्य घटकातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता आहे, मात्र योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे ते पुढे जाऊ शकत नाहीत. अशा उपक्रमांमधून त्यांना दिशा देण्याचे कार्य होत असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमात तथागत प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू कुटुंबातील १५० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थी शिक्षित व्हावा आणि सर्वसामान्य कुटुंबातून अधिकारी घडविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. यासाठी प्रतिष्ठानच्या माध्यमातून भविष्यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा मानस देखील व्यक्त करण्यात आला.

# SPOT NEWS


## राहुरी निवडणुकीत मतदान केंद्रांच्या २०० मीटर परिसरात निर्बंध लागू

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतदान केंद्रांच्या २०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये निर्बंध लागू करण्यात आले आहेत.याबाबतचे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जारी केले आहेत. या आदेशानुसार संबंधित परिसरात मंडपे व दुकाने उभारण्यास, अनधिकृत व्यक्तींना प्रवेश देण्यास तसेच मोबाईल, स्मार्टफोन, वायरलेस उपकरणे, ध्वनिक्षेपक आदी इलेक्ट्रॉनिक साधने बाळगण्यास मनाई आहे. तसेच खाजगी वाहने आणण्यास व राजकीय पक्षांच्या चिन्हांचे प्रदर्शन करण्यासही प्रतिबंध करण्यात आला आहे. मतदान केंद्राच्या परिसरात केवळ मतदार व निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांनाच प्रवेश राहील. सदर आदेश भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) अन्वये जारी करण्यात आला असून तो मतदान सुरू झाल्यापासून मतदान समाप्त होईपर्यंत लागू राहील.

## राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परिक्षेत कु. श्रीशा लामखडे हिचा राज्यात पहिला क्रमांक

**● निघोज । वीरभूमी –**



निघोज येथील बांधकाम व्यावसायिक गणेश लामखडे व आदर्श गृहिणी सुरेखा लामखडे यांची कन्या श्रीशा लामखडे हिने राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परिक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. श्रीशा ही पहिलीपासून गुणवंत विद्यार्थीनी म्हणून लौकिक असून आई वडील यांचे पाठबळ, शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाल्याने शैक्षणिक प्रगती असो किंवा खेळाडू म्हणून श्रीशा हिने चमकदार कामगिरी करीत राज्यातील अनेक नामांकित स्पर्धेत यश मिळवले आहे. श्रीशा हिच्या या शैक्षणिक कामगीरी बद्दल सर्वत्र कौतुक होत असून प्रसिद्ध वास्तुविशारद तज्ञ वसंत वांढेकर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ, मनिकर्णीका ज्वेलर्सचे मालक व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे, शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे तसेच प्राचार्य, मुख्याध्यापक सर्व शिक्षक, पत्रकार संघ, स्कूल कमीटी, शालेय व्यवस्थापन कमीटी यांनी अभिनंदन केले आहे. श्रीशा हिच्या या सर्वोच्च शैक्षणिक कामगीरी बद्दल संतोषशेठ रसाळ मित्र मंडळ वतीने पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज या ठिकाणी लवकरच सत्कार करण्यात येणार आहे.

## नवदृष्टी मिळालेले मतदार राहुरी निवडणुकीत बजावणार मतदानाचे हक्क

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या माध्यमातून नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना मतदानाचे कर्तव्य बजावण्याचे आवाहन करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुक आणि पुढील जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये देखील मतदानाचा हक्क बजावून सक्षम उमेदवार निवडून देण्याचे स्पष्ट करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुकीत ज्या गावात शंभर टक्के मतदान होईल त्या ग्रामपंचायतला संस्थेच्या वतीने ५१ हजार रुपयाचे बक्षीस देऊन सन्मान केला जाणार असल्याची माहिती फिनिक्सचे संस्थापक जालिंदर बोरुडे यांनी दिली. फिनिक्स सोशल फाउंडेशनने मोफत नेत्र तपासणी शिबिराबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत एक आगळा-वेगळा मतदार जागृतीचा उपक्रम हाती घेतला आहे. नागरदेवळे (ता. नगर) येथे नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरास महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू व काचबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी करून, त्यांची मोफत शस्त्रक्रिया पुणे येथील के. के. आय. बुधराणी रुग्णालयात यशस्वीरीत्या करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर दृष्टी परत मिळालेल्या रुग्णांचे शहरात आगमन होताच फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत, या नव्या दृष्टीचा उपयोग केवळ स्वतःच्या जीवनातच नव्हे, तर लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठीही करावा, असे आवाहन केले. मतदान हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे. नवदृष्टीतून चांगला, प्रामाणिक आणि विकासाभिमुख उमेदवार निवडण्यासाठी सर्वांनी मतदान करावे, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागरिक व महिलांनीही मिळालेल्या नवदृष्टीतून योग्य उमेदवाराची निवड करून मतदानाचा हक्क बजावण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शिक्षण क्षेत्रातील भ्रामक जाहिरातींविरोधात ग्राहक पंचायतीचा एल्गार

### शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन सादर । दिशाभूल करणाऱ्या शाळा व कोचिंग संस्थांवर कारवाईची मागणी

**● पारनेर । वीरभूमी –**

शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भ्रामक जाहिराती आणि पालकांची होणारी दिशाभूल या गंभीर विषयाची दखल घेत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. चुकीच्या नावांचा वापर करून पालकांना आकर्षित करणाऱ्या शाळा आणि कोचिंग संस्थांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ग्राहक पंचायतीच्या शिष्टमंडळाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन सादर केले.



राज्य शासनाने २५ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार शिक्षण क्षेत्रातील फसवणुकीच्या प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे. मात्र, आजही अनेक शाळा आणि कोचिंग क्लासेस स्वतःच्या नावापुढे 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई पॅटर्न' किंवा 'इंग्रजी माध्यम' असे भ्रामक शब्द लावून पालकांची सर्रास फसवणूक करत आहेत. प्रत्यक्षात या संस्थांकडे संबंधित बोर्डाची कोणतीही अधिकृत मान्यता नसतानाही केवळ व्यावसायिक फायद्यासाठी अशा नावांचा वापर केला जात आहे. तसेच '१०० टक्के निकालाची हमी' अशा आश्वासनांच्या आधारे पालकांकडून भरमसाठ शुल्क उकळले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याप्रसंगी ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे यांनी सांगितले की, जिल्हाभर शिक्षण क्षेत्रातील भ्रामक जाहिराती आणि दिशाभूल करणाऱ्या शाळांविषयी पालकांमध्ये जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी म्हणाले की, विद्यार्थी हे केवळ शिक्षण घेणारे घटक नसून ते ग्राहक संरक्षण कायद्याच्या कक्षेत येतात. त्यांना दर्जेदार आणि पारदर्शक शिक्षण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. सध्याच्या परिस्थितीमुळे पालकांचे आर्थिक आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, हे यापुढे खपवून घेतले जाणार नाही.

प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत : भ्रामक नावांचा वापर करणाऱ्या संस्थांची तातडीने चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी. शाळांची मान्यता, संलग्न बोर्ड आणि शुल्क रचनेची माहिती शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर सार्वजनिक करावी. कोचिंग क्लासेसच्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी. पालक व विद्यार्थ्यांसाठी तक्रार निवारण केंद्र व हेल्पलाईन तात्काळ सुरू करावी. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सरकारी शाळांचे बळकटीकरण करावे.

यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत मध्य महाराष्ट्र प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे, जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी, जिल्हाध्यक्षा अमिता कोहली, जिल्हा प्रतिनिधी भगवान गायकवाड, हरिभाऊ चौधरी, सुभाष औटी आणि प्रकाश रासकर उपस्थित होते. या निवेदनाच्या प्रती प्रधान सचिव (शिक्षण विभाग) आणि शिक्षण संचालक यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. प्रशासनाने यावर तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्राहक पंचायतने दिला आहे.

# औसरकर मळा परिसरात 'आनंद चालीसा' पठणास उत्साहात प्रारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

सारसनगर परिसरातील औसरकर मळा येथे गुरु भक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी 'आनंद चालीसा' पठण या धार्मिक उपक्रमास उत्साहात प्रारंभ झाला आहे. प्रवर्तक गुरुदेव श्री कुंदनऋषि महाराज यांच्या प्रेरणेने प्रत्येक शनिवारी रात्री ९ वाजता हा उपक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे.

शनिवार (ता. १८) रोजी महासतीजी श्री ज्ञानप्रभाजी 'सरल' महाराज यांच्या सान्निध्यात ओम कॉलनी, नानाजी नगर, सारसनगर येथील श्री अमृतलाल चोरडिया यांच्या निवासस्थानी



'आनंद चालीसा' पठण भावपूर्ण वातावरणात पार पडले.

याप्रसंगी सुनील गांधी, रितेश पारख, सुरेश मुनोत, हिरालाल गुंदेचा, दिपक कासवा, रोहित गांधी, पियुष भंडारी, नील गांधी, मोहित गांधी, सागर चोरडिया, आकाश चोरडिया, तुषार चोरडिया, दिपक गुगळे, प्रणय चोरडिया, प्रितेश लुंकड, अशोक छल्लाणी, कनकमल गांधी, किरण उकिर्डे, राजेंद्र नागपुरे आदी उपस्थित होते.

औसरकर मळा व परिसरात दर शनिवारी रात्री ९ ते ९.३० या वेळेत 'आनंद चालीसा' पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, या उपक्रमात अधिकाधिक श्रद्धाळूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहताना वेळेपूर्वी येऊन संपूर्ण पठणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# राहुरी पोटनिवडणुकीत प्रचारानंतर बाहेरील कार्यकर्त्यांवर निर्बंध

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राहुरी विधानसभा पोटनिवडणूक २०२६ पारदर्शक व शांततेत पार पडावी यासाठी प्रचार कालावधी संपल्यानंतर मतदारसंघाबाहेरील राजकीय कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्यास बंदी घालण्यात आली असून हे निर्बंध २१ एप्रिल सायंकाळी ६ वाजल्यापासून २४ एप्रिलपर्यंत लागू राहतील, असे आदेश जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जारी केले आहेत.

मतदारसंघात मुक्त व निष्पक्ष मतदानाचे वातावरण अबाधित राहावे यासाठी प्रचार संपल्यानंतर बाहेरील राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, मिरवणूक व प्रचार पथकातील सदस्य यांना तत्काळ मतदारसंघ सोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींनी या सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

निवडणूक प्रशासनाकडून या निर्बंधांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. त्यामध्ये कल्याण मंडप, मंगल कार्यालये व सामुदायिक सभागृहांची तपासणी करून बाहेरील व्यक्तींचा निवास आहे का याची पडताळणी केली जाईल. तसेच निवासगृह व अतिथिगृहांमधील राहणाऱ्यांची नोंद तपासली जाईल.

याशिवाय मतदारसंघाच्या सीमांवर तपासणी नाके उभारून बाहेरील वाहनांच्या येण्या-जाण्यावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. संशयित व्यक्तींची ओळख पटविण्यासाठी ओळखपत्रांची तपासणी करून ते मतदार आहेत की नाही याची खात्री केली जाईल. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात ३८४४ रुग्णांना सुमारे ३१ कोटी १९ लाखांची मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी 'मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्य निधी' हा महत्त्वाचा आधार ठरत आहे. सदर आर्थिक वर्षात अहिल्यानगर जिल्ह्यातील ३८४४ रुग्णांना सुमारे ३१ कोटी १९ लाख रुपयांची वैद्यकीय मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, कागदविरहित अर्ज प्रक्रिया आणि अर्जांचा तातडीने निपटारा यांसारखे सकारात्मक बदल करण्यात आले आहेत. तसेच सामंजस्य करार आणि लोकसहभागातून निधी उभारणी (क्राउड फंडिंग)च्या माध्यमातून सहकार्य करणारी रुग्णालये, धर्मादाय संस्था आणि दाते यांचे मोलाचे योगदान लाभत आहे.

मुख्यमंत्री साहाय्य निधीच्या कार्यपद्धतीत करण्यात आलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्यामुळे पारदर्शकता वाढली असून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक साहाय्य मिळत आहे.




कॉक्लियर इम्प्लांट (वय २ ते ६ वर्षे), हृदयरोग, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हात, गुडघा प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, डायलिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशूंचे आजार, भाजलेले (बर्न) रुग्ण आणि विद्युत अपघातग्रस्त रुग्ण अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसाहाय्य दिले जाते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री साहाय्य निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक उत्तरदायित्व अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार अधिक सुलभ होणार आहेत.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४०,७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. याच कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यातील ३८४४ रुग्णांना ३१ कोटी १९ लाख ७३ हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कक्षाचे कामकाज प्रभावीपणे सुरू आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात लक्षणीय संख्येने रुग्णांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. अधिकाधिक गरजू रुग्णांपर्यंत मदत पोहोचवण्याला सातत्याने प्राधान्य दिले जात आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.असे आवाहन मुख्यमंत्री साहाय्य निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखा, जिल्हा शाखा व महिला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित विविध शालेय स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. चित्रकला, वकृत्व आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन दि. ११, १२ व १३ एप्रिल रोजी सिद्धार्थनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे करण्यात आले होते.

चित्रकला स्पर्धेत एकूण ४८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. पहिली ते चौथी गटात प्रथम राजरत्न सनी महागडे, द्वितीय अर्णवी अमोल शेलार, तृतीय खुशी दिनेश चव्हाण यांनी क्रमांक पटकावले. पाचवी ते दहावी गटात प्रथम मयूर रवी वाकोडे, द्वितीय अनुग्रह मनोज घोरपडे, तृतीय यश सचिन क्षेत्रे हे विजेते ठरले.

वकृत्व स्पर्धेत २८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. पहिली ते सहावी गटात प्रथम प्रेरणा गितेश गायकवाड, द्वितीय आदिती विनोद गायकवाड, तृतीय प्रेम अजय गायकवाड, तर उत्तेजनार्थ सत्यम प्रमोद पडागळे यांचा समावेश होता. सातवी ते बारावी गटात प्रथम ज्ञानेश्वरी सुनिल खेडकर, द्वितीय प्रांजल भगवान थोरात, तृतीय वैष्णवी किरण लाड, तसेच उत्तेजनार्थ प्रतीक्षा दिपक केदारी यांनी



यश संपादन केले.

रांगोळी स्पर्धेत २७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. प्रथम अनुष्का चौधरी, द्वितीय अंशूकुमारी पंडित, तृतीय चैत्राली बारटक्के यांना पारितोषिके मिळाली. उत्तेजनार्थ हर्षदा काजळकर व प्रेरणा चक्रनारायण यांचा गौरव करण्यात आला. सर्व विजेत्यांना अनुक्रमे रोख रुपये ३००, २०० व १०० तसेच संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धांचे पारितोषिक वितरण जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, रविंद्र कांबळे, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, हर्षाताई पंचमुख, रेखाताई भिंगारदिवे, रत्नमाला पाटोळे, मोहनजी शिरसाट, राजेंद्र पाडळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शहर शाखेचे अध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, उपाध्यक्ष मोहन शिरसाट, हिशोब तपासणी प्रमुख राजेंद्र पाडळे, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, सचिव शशिकांत घोडके, संघटक राजेंद्र थोरात, संतोष जाधव, संजय डहाणे, अविनाश राक्षे आदींनी परिश्रम घेतले.

तसेच जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सचिव रविंद्र कांबळे, भगवंतराव गायकवाड, राहुल कांबळे, महिला शाखेच्या जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड, उपाध्यक्षा हर्षाताई पंचमुख, शहराध्यक्षा रेखाताई भिंगारदिवे, दीपा चव्हाण, विद्या शिंदे, शोभा घोडके यांनीही सहकार्य केले.

स्पर्धांचे परीक्षक म्हणून माजी प्राचार्य विलास साठे, प्राचार्य महावीर सोनटक्के, वस्तीगृह अधीक्षिका ज्योती गायकवाड, निवृत्त शिक्षिका रत्नमाला पाटोळे, तसेच शेखर उंडे यांनी काम पाहिले.

# संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या सात विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

### ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाची यशस्वी कामगिरी

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभागाच्या पुढाकारातून सात विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये आकर्षक पगाराच्या नोकऱ्यांसाठी निवड झाली आहे. संजीवनीत प्रवेश म्हणजे नामांकित कंपनीत नोकरी किंवा यशस्वी उद्योजक होण्याची संधी, हे समीकरण दरवर्षीप्रमाणे यंदाही कायम असल्याचे या यशातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

निवड झालेले विद्यार्थी अंतिम सत्रातील असून त्यांच्या परीक्षेच्या निकालापूर्वीच त्यांना नोकरीची ऑफर मिळाली आहे. कॉनकास्ट (इंडिया) प्रा. लि. या कंपनीने सिव्हिल इंजिनिअरिंगच्या प्रतीक्षा रामदास पुरी आणि स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगच्या प्रशांत रमेश व्यापारे यांची निवड केली आहे. मॅक्स सरफेस ट्रीटमेंट प्रा. लि. या कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या निलेश दीपक




रासकर, दीप बाबासाहेब सोनवणे आणि सुयश प्रदीप थोरात यांची निवड केली आहे. आर्मस्ट्रॉन्ग डिमॅटीक लिमिटेड या कंपनीने मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंगच्या सक्षम महेंद्र कुलकर्णी आणि आदित्य बाळासाहेब वारुळे यांची निवड केली आहे.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाकडून विद्यार्थ्यांची मुलाखतीपासून व्यक्तिमत्व विकासापर्यंत सर्वांगीण तयारी करून घेतली जाते. तसेच उद्योग क्षेत्रातील नामांकित कंपन्यांच्या व्यवस्थापनाशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांना आवश्यक असलेल्या कौशल्यांचा अभ्यास केला जातो आणि त्यानुसार विद्यार्थ्यांना घडवले जाते. त्यामुळे अनेक प्रतिष्ठित कंपन्या संजीवनीच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देतात.

आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात नोकरी मिळवणे आव्हानात्मक असताना, संजीवनीने केवळ शैक्षणिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला योग्य संधी मिळावी यासाठी संस्थेने सातत्याने आणि जिद्दीने काम केले आहे.

या प्रयत्नांचे यश विद्यार्थ्यांच्या निवडीमधून स्पष्ट दिसून येत आहे. आपल्या मुलांना चांगल्या नोकऱ्या मिळाल्यामुळे पालकांनीही समाधान व्यक्त करत संजीवनीच्या व्यवस्थापनाचे आभार मानले आहेत.

संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# डॉक्टर हे शरीर तर केमिस्ट हा त्याचा आत्मा

## भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील । शहरात नूतन केमिस्ट भवनाचे उद्घाटन । वार्षिक सभेत सर्वानुमते विषय मंजूर

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
विखे परिवाराशी केमिस्ट बांधवांचे नेहमीच ऋणानुबंध राहिले आहे. सर्व या परिवाराशी जोडलेले आहेत. मागील काळात पेशंट चुकला व गोळ्याही चुकल्या. या वेळेस सर्व व्यवस्थित उपचार झाले आहेत. सन २०२९ ला डॉक्टर व केमिस्ट यांची जोडी सर्व आजारांवर उपचार ठरेल, असा विश्वास माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त करत ते म्हणाले, डॉक्टर हे शरीर तर केमिस्ट हा त्याचा आत्मा आहे. डॉक्टरचे कर्ज केमिस्ट शिवाय फिटू शकत नसल्याचा उपहासात्मक टोला लगावताच सभागृहात एकच हशा पिकला.

अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुरुडगांव रोड येथे उभारण्यात आलेल्या नूतन केमिस्ट भवनाचे उद्घाटन अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विखे बोलत होते. याप्रसंगी आमदार सत्यजीत तांबे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे सचिव अनिलजी नावंदर, एम.आय.ओ.सी.डी. सदस्य अजित पारख, उपाध्यक्ष सेंल झोन ऑफ एम.एस. सी.डी.ए. शशांक रासकर, संघटक सचिव चेतनकुमार कर्डिले, औषध निरीक्षक (अन्न व औषध प्रशासन) जावेद शेख, औषध निरीक्षक सोमनाथ मुळे, राजस्थान केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद गुप्ता, संघटनमंत्री अजित पाल, ए.आय.ओ.सी.डी. सदस्य अजित पारख तसेच कै. ओमप्रकाश गुलाटी ट्रस्टचे अध्यक्ष रविंद्र गुलाटी, जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेद्रे व खजिनदार प्रशांत उबाळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, केमिस्ट बांधवांचा खरा दैवत रुग्ण आहे. त्याची सेवा या भवनाच्या माध्यमातून झाली पाहिजे. सर्व प्रकारची रुग्णांसाठी उपलब्ध केली जाणार आहे. युग बदलले नवनवीन प्रशिक्षण केमिस्ट बांधवांना देण्याचा प्रयत्न राहणार आहे. भविष्यात अनेक समस्यांना तोंड द्यायचे आहे, यासाठी संघटनेची एकजूट ठेवण्याचे त्यांनी आवाहन केले.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, महाराष्ट्रात केमिस्ट्री सर्वात मजबूत संघटना आहे. तालुकास्तरावर केमिस्ट भवन उभारण्यात आलेले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात प्राईम लोकेशनवर झालेले हे भवन जिल्ह्यातील केमिस्ट बांधवांसाठी उपयुक्त ठरणार आहे. केमिस्ट बांधवांसाठी अनेक वर्षापासूनची ही स्वप्नपूर्ती झाली असून, संपूर्ण राज्यात आप्पासाहेब शिंदे यांच्यावर केमिस्ट बांधवांचे मोठे प्रेम असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर म्हणाले की, नूतन केमिस्ट भवन हे केवळ कार्यालयीन जागा नसून, जिल्ह्यातील केमिस्ट बांधवांसाठी संवाद, नियोजन आणि प्रशिक्षण यांचे केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. या भवनामुळे संघटनात्मक कार्य अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, विविध सामाजिक व व्यावसायिक उपक्रमांना चालना मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्व केमिस्ट कार्यकारिणीच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष सुर्यकांत भुजाडी, गणेश वाणी, अतुल चांगले, सहसचिव सचिन शिंदे, शहर उपाध्यक्ष भरत सुपेकर, शहर सचिव मनिष सोमाणी, शहर खजिनदार मनोज खेडकर, शहर सहसचिव मनिषा महेश आठरे तसेच सर्व



कार्यकारिणी सदस्य, जिल्हा, शहर व तालुका केमिस्ट असोसिएशनचे सदस्य आणि संयुक्त केमिस्ट भवन निर्माण समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

केमिस्ट असोसिएशनची वार्षिक सभा नक्षत्र लॉन व सांस्कृतिक हॉल येथे आप्पासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत मागील इतिवृत्त वाचून कायम करण्यात आला. खर्चाला व ताळेबंदला मंजूरी देण्यात आली. सभे पुढील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. या सभेसाठी जिल्ह्यातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित महाराज धाडगे यांनी केले. आभार सुर्यकांत भूजाडी यांनी मानले.

# समता इंटरनॅशनल स्कूलचा उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम

## सीबीएसई दहावी परीक्षेत घवघवीत यश । ५०% विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा अधिक गुण

● **कोपरगाव । वीरभूमी –**
समता इंटरनॅशनल स्कूलने सलग दहाव्या वर्षी यशाची दैदिप्यमान पताका फडकावत शैक्षणिक क्षेत्रात नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या सीबीएसई इयत्ता १० वी परीक्षेत ९२ टक्के विद्यार्थ्यांनी ७०% पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली, तर ५० टक्के विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवत सर्वोत्कृष्टतेची नवी उंची गाठली. या निकालात विद्यार्थ्यांनी गुणांचा लक्षणीय वर्षाव करत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली आहे.

या यशामागे शाळेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. स्वाती संदीप कोयटे यांचे प्रेरणादायी व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्राचार्य समीर अत्तार यांचे अचूक नियोजन आणि सर्व शिक्षकांचे सखोल व





सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेला योग्य दिशा देत त्यांच्यात यशाची प्रेरणा जागृत केली आणि त्यातूनच हा उल्लेखनीय निकाल साकार झाला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे म्हणाले, विद्यार्थ्यांचे हे यश केवळ गुणांचे नसून त्यांच्या परिश्रम, शिस्त आणि ध्येयपूर्तीच्या जिद्दीचे प्रतीक आहे. समता इंटरनॅशनल स्कूलचा प्रत्येक विद्यार्थी उद्याचा सक्षम आणि सजग नागरिक आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. पुढील काळातही उत्कृष्टतेच्या नव्या उंची गाठण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

समता इंटरनॅशनल स्कूलचा हा निकाल केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नपूर्तीचा, मेहनतीचा आणि यशस्वी प्रवासाचा प्रेरणादायी नमुना आहे. गेल्या दहा वर्षांत शाळेने केवळ उत्तम निकालच दिले नाहीत, तर सक्षम, प्रेरित आणि ध्येयवेडे नागरिक घडवले आहेत, याची ही ठोस साक्ष आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांवर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला असून त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

### उल्लेखनीय कामगिरी

■ समता इंटरनॅशनल स्कूलच्या सीबीएसई इयत्ता १० वी परीक्षेत आर्या राहुल सांड हिने ९९% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. राजेश्वरी चैतन्य तांबे हिने ९८% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला तसेच सामाजिक शास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष यश संपादन केले. दृष्टी खुशाल ठाकूर हिने ९७% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच माहिती तंत्रज्ञान (IT) विषयात ११ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने जाहीर करा

## लहुजी सेना व शाहू-फुले-आंबेडकर-साठे कलाम विचारमंचची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने जाहीर करावे, अशी मागणी भारतीय लहुजी सेना व शाहू-फुले-आंबेडकर-साठे कलाम विचारमंचच्या वतीने जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांची भेट घेऊन निवेदन दिले. हे निवेदन त्यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना पाठविण्यात आले आहे.

निवेदन देतेवेळी विचारमंचचे सुनिल सकट, अशोक शिंदे, उषाताई शिंदे, लखन साळवे,



अशोक भोसले, आसाराम साबळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात या उपवर्गीकरणाची तीव्र गरज असून, त्याद्वारे राज्यातील अतिवंचित व मागास घटकांना समतोल व न्याय्य प्रतिनिधित्व मिळण्यास मदत होणार आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

संघटनांच्या म्हणण्यानुसार, उपवर्गीकरणाची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर उपवर्गीकरण जाहीर करावे, तसेच त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, उपवर्गीकरणाची अंमलबजावणी होईपर्यंत राज्यात सुरू असलेली शासकीय मेगा नोकर भरती प्रक्रिया तात्पुरती स्थगित करावी, जेणेकरून सर्व घटकांना न्याय मिळेल, अशीही मागणी भारतीय लहुजी सेना व शाहू-फुले-आंबेडकर-साठे कलाम विचारमंचच्या वतीने निवेदनात करण्यात आली आहे.

# बोल्हेगावात तीन दिवसीय भीम जयंती सोहळ्याचा उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
ज्ञानदीप फाउंडेशनच्या वतीने बोल्हेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय भीम जयंती सोहळ्याचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात संविधान जागर, पारंपारिक वाद्यांच्या गजरात सांस्कृतिक सादरीकरणे, भीम गीतांचा कार्यक्रम तसेच विचारप्रवर्तक व्याख्यानांनी उपस्थितांना भारावून टाकले.

कार्यक्रमास ज्येष्ठ आंबेडकरवादी नेते अशोक गायकवाड, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, महापालिका पाणी पुरवठा विभाग प्रमुख परिमल निकम, सुमेध गायकवाड, विशाल भिंगारदिवे, संजय कांबळे, संदीप वाघमारे, अण्णा गायकवाड, प्रा. पगारे, कौशल गायकवाड, अनिल कजबे, संस्थेचे अध्यक्ष पंकज राजेंद्र लोखंडे, संचालिका प्राजक्ता पंकज लोखंडे, जयश्री गायकवाड, विठ्ठल उमाप, ज्योती साठे, राजेंद्र लोखंडे, क्लेरा लोखंडे, राजू डोईफोडे, अमित लोखंडे, सारंग कराळे, शांताताई कराळे, नितीन साठे, सुदेश गायकवाड आदी उपस्थित होते.

या सोहळ्याच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करत विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विविध स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. जयंती मिरवणुकीतील लेझिम पथकातील मुला-मुलींचा विशेष सन्मान करण्यात आला.

कु. ज्योती राजेश सकट यांची धर्मदाय आयुक्त निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल गौरव करण्यात आला, तर प्रांजली पंकज लोखंडे हिच्या मंथन परीक्षेतील यशाबद्दल सत्कार करण्यात आला.

संविधान जागर सोहळ्यात संविधानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. भीमगीतांच्या कार्यक्रमात सादरीकरणांनी वातावरण भारावले. कामगार नेते कॉ. अनंत लोखंडे यांनीही भीमगीत सादर केले. विठ्ठल उमाप यांनी मार्गदर्शन करत एकात्मता व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. प्रफुल्ल लोखंडे या विद्यार्थ्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले.

प्रास्ताविकात पंकज लोखंडे यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे संवर्धन करण्याची गरज अधोरेखित केली. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

# मुख्याध्यापिका रत्नप्रभा महांडुळे यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

## विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या उपस्थितीत कृतज्ञतेचा स्नेहमेळावा । कार्याचा गौरव करत अश्रुपूर्ण निरोप

● **पाथर्डी । वीरभूमी–**
जिल्हा परिषद कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका रत्नप्रभा महांडुळे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित निरोप समारंभ नुकताच शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत अत्यंत कौटुंबिक व भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षे शाळेच्या प्रगतीसाठी केलेल्या त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

यावेळी गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, विस्तार अधिकारी, शाळेच्या माजी मुख्याध्यापिका घुले मॅडम व केंद्रप्रमुख सविता कुटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. याशिवाय पीएमश्री शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा तुपे यांच्यासह अनुराधा तरवडे, ज्योती जाधव, भावना देवरे, शीला नागरे, मंगल कीर्तने, मंदा पालवे, सुरेखा बडे, दिपाली भोसले, छाया चंदनशिव, अर्चना खाडे, मनीषा फटांगरे, लता भंडारी, जायभाय सर, पालक व पत्रकार अनिल खाटेर आदींसह शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारंभाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रत्नप्रभा महांडुळे यांचा शाल, साडी, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांच्या शांत, संयमी स्वभावाचा, अभ्यासू व्यक्तिमत्त्वाचा तसेच अध्यापन आणि प्रशासकीय कामातील उत्कृष्ट पकडीचा विशेष उल्लेख केला. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, तसेच सहकारी शिक्षकांना दिलेली सततची मदत व सहकार्यपूर्ण वागणूक यामुळे त्यांनी शाळेच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिल्याचे वक्त्यांनी नमूद केले. शिष्यवृत्ती तसेच स्पर्धा परीक्षा व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतही त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त करताना आपल्या आवडत्या मुख्याध्यापिकांबद्दलच्या आठवणींना उजाळा दिला. अनेक विद्यार्थी व शिक्षकांच्या



डोळ्यांत अश्रू दाटून आले होते, यावरून समारंभातील भावनिक वातावरणाची प्रचिती आली. पालकांच्या वतीने अनिल खाटेर यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लता भंडारी यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन अनुराधा तरवडे यांनी मानले. शेवटी सर्वांनी रत्नप्रभा महांडुळे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत साश्रुनयनांनी निरोप दिला.

# पाथर्डीत वारकरी संप्रदायाविषयी आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध

## विकास लवांडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी । कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

● **पाथर्डी । वीरभूमी–**
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रवक्ते विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदायातील संत-महंतांविषयी केलेल्या आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्याचा निषेध करत त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी पाथर्डी तालुका सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पाथर्डी पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले.

यावेळी हभप. गोविंद महाराज जाटदेवळेकर, हभप दिपक महाराज काळे, अॅड. नामदेव जायभाय, सोमनाथ बंग, प्रथमेश नाकिल आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, विकास लवांडे यांनी अलीकडेच घेतलेल्या पत्रकार परिषदेत वारकरी संप्रदायातील पूजनीय संतांविषयी चुकीचे



व अपमानास्पद विधान केले. त्यांनी ह.भ.प. भास्करगिरीजी महाराज, ह.भ.प. गोसेवक संजय महाराज पाचपोर, ह.भ.प. संग्राम बापू भंडारे, ह.भ.प. रामगिरीजी हराजानी तसेच ह.भ.प. गोविंदगिरीजी महाराज यांच्याबाबत संप्रदायामध्ये घुसखोरी असल्याचा आरोप केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील लाखो भाविकांचा श्रद्धास्थान असून अशा प्रकारच्या वक्तव्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच, या प्रकारामुळे समाजात तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

यामुळे संबंधित प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये विकास लवांडे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, याबाबत तातडीने कारवाई न झाल्यास सकल हिंदू समाजाच्या वतीने पाथर्डी तालुक्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# नाशिक विभागात १९३३ अनाथ प्रमाणपत्रांचे वितरण

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
अनाथ प्रमाणपत्राच्या आधारे १ टक्का समांतर आरक्षण उपलब्ध होत असून त्यातून शिक्षण व शासकीय नोकरीत संधी मिळत आहे; नाशिक विभागात आतापर्यंत १९३३ बालकांना प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत, अशी महिला व बाल विकास विभागाचे नाशिक विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे यांनी दिली.

१८ वर्षांखालील बालकाचे आई-वडील निधन पावल्यास त्या बालकाला अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाते. या आरक्षणाचा लाभ व्यावसायिक शिक्षण, नियमित शिक्षण व नोकरीसाठी होत आहे. वितरित प्रमाणपत्रांपैकी ५८० लाभार्थी मुली आहेत.

नाशिक विभागांतर्गत दिलेल्या

### अनाथ आरक्षणातून शिक्षण व नोकरीत संधी

प्रमाणपत्रांपैकी १६२ अनाथ प्रमाणपत्रधारकांना शासकीय नोकरी मिळाली आहे. त्यामुळे या योजनेचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थ्यांना होत असल्याचे दिसून येते.

अनाथ प्रमाणपत्रासाठी संबंधित जिल्ह्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडे आई-वडिलांच्या मृत्यूच्या दाखल्यासह प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यानंतर बालकल्याण समितीची शिफारस घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्या माध्यमातून प्रमाणपत्र निर्गमित केले जाते.